# प्रकरण –15

आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी रुग्णालयाने अंगिकृत केलेली तत्वे

जी व्यक्ती रुग्णालयातील बाहेय रुग्ण विभागास संपर्क करते, त्या व्यक्तीस संबंधित विभागीय डॉक्टर जितक्या लवकर शक्य असेल तितक्या लवकर भेटतील.

कोणत्याही आकस्मिक प्रसंगी कर्तव्यावर असलेले डॉक्टर रुग्णाकडे त्वरित लक्ष देऊन इलाज सुरु करतात.

सर्व अंतर्गत रुग्णांची तपासणी रोज सकाळी 10.00 वाजण्यापूर्वी व जेव्हा जेव्हां आवश्यक असेल तेव्हां तेव्हां करण्यात येते.

बाहय रुग्ण विभागात आल्यानंतर त्याच दिवशी किंवा सकाळी विकृती विद्‌यमान तपासणी करण्यात येते.

बाहय रुग्ण विभागात आल्यापासून अत्यवस्थ रुग्णांच्या बाबतीत त्याच दिवशी एका तासाच्या आत आणि इतर बाबतीत दुस-या दिवशी क्ष-किरण आणि हृदय स्पंदन आलेख घेतले जातात.

सर्व रुग्णांना परिशिष्टामधील औषधे रोजच्या रोज उपलब्ध करुन देण्यात येतात.

रुग्णालयाच्या प्राधिका-यांना लिहिलेल्या कोणत्याही तक्रारीचे निवारण जेवढया लवकर शक्य असेल तेवढया लवकर करण्यात येते.

सुश्रुषा कर्मचारी रुग्णांना जेवढी उत्तम सेवा देता येईल तेवढी देण्याचा पूर्ण प्रयत्न करतात.

सर्व रुग्णालयीन कर्मचा-यांचा दृष्टीकोन सहानुभूतीचा आणि नम्रतेचा असतो.

गरीब धर्मादाय निधी गरीब आणि गरजू रुग्णांसाठी वापरला जातो.

सही/-
वैद्‌यकिय अधिक्षक,
के.बी.भाभा रुग्णालय कुर्ला(प)